MAHMAR 2014/59740

संपूर्ण महाराष्ट्रामध्ये पोहचणारे एकमेव शैक्षणिक मासिक

# प्रेरणा जनहित मंच


कार्यकारी संपादक : श्रीमती संध्या देशपांडे | संस्थापक संपादक : प्राचार्य प्रकाश कराळे

वर्ष : ८ वे | अंक : | मे २०१७ | मूल्य : १० रु. | अहमदनगर | POST REG. NO : ANR/058215-2017



# दादासाहेब गायकवाड; सन्मान पोलीस मित्राचा

दंगल झाली पोलीस जबाबदार... खून झाला, दरोडा पडला, चोरी झाली पोलीस जबाबदार... अत्याचार झाला, पोलीस जबाबदार... अवैध व्यवसाय वाढले, पोलीस जबाबदार... आपघात वाढले, पोलीस जबाबदार... असं असलं तरी हा पोलीस बारा महिने सर्वसामान्यांच्या सेवेत असतो. त्याच्यामुळेच सर्वसामान्यांची घर व घरातील प्रत्येक जण सुरक्षितेची भावना बाळगून असतो. बारा महिने सण-उत्सव शांततेने साजरे करण्यासाठी तो आपलं घर सोडून सेवेत असतो. अशा या पोलिसांच्या सुख-दुःखात सहभागी सर्वसामान्य सहभागी होण्याचा प्रयत्नच करत नाही. मित्र होण्याचा, सखा होण्याचा प्रयत्न करतच नाही. पण, सोलापूर जिल्ह्यातील करमाळा येथील सावडीमधील दादासाहेब गायकवाड हे मात्र त्याला अपवाद आहेत. पोलीस अधिकाऱ्यांपासून ते कर्मचाऱ्यांपर्यंत त्यांच्या सुखाबरोबर दुःखात दादासाहेब गायकवाड गेल्या ४५ वर्षांपासून सहभागी होत आहे. त्यामुळे त्यांचे आय. एस. आणि आय.पी.एस. पोलीस अधिकाऱ्यांबरोबरच पोलीस कर्मचाऱ्यांबरोबर असलेले संबंध हे मैत्रीपेक्षा एका मैत्र बंधांत गुंतले आहेत. दादासाहेब गायकवाड यांचे हे संबंध कोणत्या एका तालुक्या किंवा गावापुरते नसून संपूर्ण राज्य पोलीस दलाशी आहेत. दादासाहेब गायकवाड यांनी हे संबंध गेल्या ४५ वर्षापासून कसे संभाळले आहेत त्याचा हा लेख प्रपंच!



एडिटोरिअल

प्राचार्य प्रकाश कराळे

१९७२ च्या दुष्काळातून राज्य सावरत होते. सोलापूर जिल्हा देखील त्यातून पुढे सरकला होता. पण, पाण्यासाठी वणवण सुरूच होती. राजकीय पक्षांनी पाण्यावरून पान ०५ वर...

## दादासाहेबांना "मैत्री" हाच मोठा पुरस्कार वाटतो

पुणे येथील विश्वमाता फाउंडेशनतर्फे देण्यात येणारा पिताश्री पुरस्कार हा माझ्या कुटुंबाशी असलेल्या मैत्रीची पावती आहे. त्यामुळे हा पुरस्कार स्वीकारताना आनंद होत आहे, असे दादासाहेब गायकवाड यांनी सांगितले. या मैत्रीने कुटुंबाला अधिकच जवळ केले आहे. आईवडिलांच्या पश्चात कुटुंबाची जबाबदारी संभाळताना कोठे कमी, तर पडलो नाही ना, अशा मनात खंत वाटत राहते. पण, मागे कुटुंबाकडे वळून पाहताना भाऊ, बहीण, पत्नी आणि मुलांचा या मैत्री पर्वात सर्वात पुढे आहे. या मित्रांशिवाय यश मिळणे अवघड होते. त्यामुळे हा पुरस्कार स्वीकारून माझ्या या मित्रांना सन्मानानं देणार आहे. विश्वमाता फाउंडेशनच्या माता-पिता पुरस्कार म्हणजे आईवडिलांचा सन्मान आहे. त्यांना त्यांच्या कुटुंबियाविषयी प्रेम, ममता, कर्तव्य याची अधिक जाणीव करून देणारा हा गौरव आहे. हा गौरव स्वीकारताना आनंद होत आहे.

दादासाहेब गायकवाड हे व्यक्तिमत्त्व कोणालाही जिंकणार असंच आहे. पोलीस मित्र म्हणून काम करताना त्यांनी अनेक समाज उपायेगी काम केले आहेत. यासाठी सामाजिक संस्थांनी, राजकीय पक्षांनी, प्रतिष्ठाननी पुरस्कार देऊ केले. पण, या पुरस्कारांच्या मोहात दादासाहेब गायकवाड कधीच पडले नाहीत. आपले काम करण्याबरोबरच त्यांनी कुटुंबाच्या प्राथमिक गोष्टींना प्राधान्य दिलं. त्यामुळे आजही त्यांच्या कुटुंबात कोणत्याही निर्णयाबाबत त्यांचाच शब्द अंतिम मानला जातो. गावात देखील त्यांच्या शब्दाला मान आहे. ते कोणतेही प्रश्न मैत्रीने सोडवितात. या मैत्रीमुळे दररोज नवीन व्यक्तिमत्त्व असलेला माणूस जोडला जातो. त्यामुळे मला रोजच मैत्री रुपात पुरस्कार मिळत असतो, असे दादासाहेब गायकवाड सांगतात.

# विश्वमाता फाउंडेशनतर्फे देशभरातील २० माता-पितांचा सन्मान

अहमदनगर : जागतिक मातृ-पितृ-कुटुंब दिनानिमित्त पुणे येथील विश्वमाता फाउंडेशनतर्फे देशभरातील सुमारे २० माता-पितांना आदर्श पुरस्काराने शुक्रवारी (ता. २६) सन्मानित करण्यात येत असल्याची माहिती फाउंडेशनचे अध्यक्ष शिवाजी घाडगे यांनी दिली. पुणे येथील बालगंधर्व रंगमंदिरात सायंकाळी पाच वाजता हा पुरस्कार सोहळा रंगणार आहे.

पुणे येथील श्री साईबाबा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक व प्रमुख विश्वस्त आमदार प्रकाश देवळे व भारत विकास परिषदेचे संघटन मंत्री सुरेश जैन यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण होईल. ज्येष्ठ पत्रकार डॉ. बाळासाहेब बोठे-पाटील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहतील. ज्येष्ठ उद्योगपती आणि समाजसेवक नंदकुमार वाळंज, पत्रकार तथा समाजसेविका पल्लवी चौधरी, सहायक पोलीस अधीक्षक शहाजीराव पाटील, फेस्कॉमचे मुख्य सचिव अरुण रोडे, डी. जी. फाउंडेशनचे अध्यक्ष अरुणजी घावत, जनसेवक कैलास दागंट, भुकूमचे आदर्श सरपंच नामदेवराव माझिरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. अजय धोटे हे सूत्रसंचालन करतील.

### आदर्श माता-पिता गौरव पुरस्काराचे मानकरी

- आशा समिंदर शेख (अहमदनगर)
- उषा सूर्यकांत खोले (अहमदनगर)
- प्रभावती अंबादास घावत (अमरावती)
- मंदा अशोक मोरे (विदर्भ)
- कौशल्याबाई शंकरराव टाक (अहमदनगर)
- सुंदराबाई सुभाना बोडरे (उस्मानाबाद)
- रेखाताई सुरेश ठोकळ (पुणे)
- शीलाताई गेहलोत-राजपूत (अकोला)
- वच्छालाबाई गोकुळदास शेन्डे (गडचिरोली)
- दादासाहेब विष्णु गायकवाड (सोलापूर)
- दत्तोबा शंकर पाचंगे (पुणे)
- रतनचंदजी ओसवाल (पुणे)
- सॅम्युअल फर्नांडीस (गोा)
- प्रकाशनारायण झा (बिहार)
- स्वामीनारायण नीजहूर (केरळ)
- सौरभ तेरेदेसाई (गुजरात)
- मीरा उमाकांत महांडुळे (अहमदनगर)
- उमाकांत हनुमंतराव महांडुळे (अहमदनगर)
- मनीषा देशमुख (राजस्थान)
- यशवंत देशमुख (राजस्थान

# नफेखोरी करणाऱ्या शिक्षण संस्थांना वटणीवर आणणार : शिक्षणमंत्री विनोद तावडे

मुंबई : विद्यमान शुल्क नियंत्रण कायद्यात लवकरच सुधारणा करण्यात येईल तसेच कोणत्याही शाळांना अथवा शिक्षण संस्थांना नफेखोरी करु देणार नाही. जर अशा पध्दतीची नफेखोरी झाल्याचे आढळून आल्यास अशा शाळा व शिक्षण संस्थांना वटणीवर आणण्यात येईलए त्याचप्रमाणे सीबीएसई आणि आयसीएसई मधील कोणत्याही शाळांना पुस्तके त्याच शाळेतूनच घेण्याची सक्ती करता येणार नाही, असे शिक्षणमंत्री श्री. विनोद तावडे यांनी आज स्पष्ट केले.

पुण्यामधील १८ शाळांपैकी आज सहा शाळांची सुनावणी शिक्षणमंत्री श्री. विनोद तावडे यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आली. या सुनावणी प्रसंगी शाळांमधील पालकांचे प्रतिनिधीत्व करणारे चार पालक, संस्थाचालक, शिक्षण विभागाचे अधिकारी उपस्थित होते. शाळांमधील फी वाढीसंदर्भातील मुद्दे पालकांनी उपस्थित केले, तर संस्थाचालकांनी त्या संदर्भात आपल्या अडचणी व आपली बाजू या बैठकीत मांडली. आजच्या सुनावणी प्रसंगी उपस्थितीत काही शाळांची सुनावणी ही येत्या दोन-तीन दिवसात फी शुल्क नियंत्रण कायद्यासमोरील समिती समोर होणार असल्यामुळे या शाळांच्या केवळ अडचणी समजावून घेण्यात आल्या.

शाळांमध्ये पालकांचे प्रतिनिधीत्व करणारी पॅरेन्टस टिचर असोसिएशन (पीटीए) च्या उपस्थित व त्यांच्या अनुमतीने संबंधित शाळांमध्ये जी फी वाढ



करण्यात आली त्या शाळांचे व्हिडीओ रेकॉर्डींग दोन दिवसात सादर करण्याचे आदेश शिक्षणमंत्री श्री. तावडे यांनी यावेळी संबंधित शाळांना दिले. त्याचप्रमाणे शाळांमध्ये स्थापन होणारी पीटीए कोणत्या पध्दतीने स्थापन होते आणि यामध्ये सदस्यांची निवड कशाप्रकारे होते याची प्रक्रिया सर्व शाळांनी काटेकोरपणे अवलंब करावी, तसेच या सर्व प्रक्रियेचे नियमानुसार व्हीडीओ रेकॉर्डींग करावे जेणेकरुन भविष्यात या अनुषंगाने उपस्थित होणाऱ्या तक्रारींचे निराकारण करण्यात येईल, अशा आशयाचे पत्रक शालेय शिक्षण विभागाच्या वतीने लवकरच काढण्यात येईल, असे श्री. तावडे यांनी स्पष्ट केले.

शाळेमधील अवास्तव फी वाढीसंदर्भात पालक शुल्क नियंत्रण समितीकडे दाद मागू शकतात, परंतु सध्याच्या शुल्क नियंत्रण कायद्यामध्ये काही त्रुटी आहेत. त्यासाठी या कायद्यात दुरुस्ती करणे आवश्यक आहे. पुढील आठवड्यात काही शाळांची फी वाढीच्या विषयवार समिती समोर सुनावणी होणार असून यावेळी संबंधित कायद्यामध्ये कोणत्या मुद्यांचा अंतर्भाव असावा याबाबत पालक आपले म्हणणे सविस्तरपणे मांडणार आहेत, शासनाच्या वतीनेही काही सूचना समितीकडे देण्यात येतील असेही श्री. तावडे यांनी सांगितले.

शासनाच्या दृष्टीने विद्यार्थ्यांचे हित महत्वाचे आहे. त्यामुळे कोणत्याही शाळांना अथवा शिक्षण संस्थांना नफेखोरी करु दिली जाणार नाही. जर अशा पध्दतीची बेकायदेशीर नफेखोरी झाल्याचे आढळून आल्यास अशा शिक्षण संस्थांना वटणीवर आणण्यात येईल, असा इशारा श्री. तावडे यांनी दिला.

सीबीएसई आणि आयसीएसई आदी शाळांमधील विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमाची पुस्तके शाळांमधूनच विकत घेणे बंधनकारक केले जात असल्याचा मुद्दा आज विविध शाळांच्या पालकांनी आजच्या बैठकीत निदर्शनास आणून दिला. त्याबद्दल बोलताना श्री. तावडे म्हणाले की कोणत्याही शाळांना विद्यार्थ्यांना त्याच शाळांमधून पुस्तके खरेदी करणे बंधनकारक करता येणार नाही. त्या शाळांनी विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या पुस्तकांची यादी आणि पुस्तक विक्रेते यांची नावे व माहिती शाळेच्या सूचना फलकावर लावून त्याची माहिती पालकांना देणे अपेक्षित आहे. असेही श्री. तावडे यांनी सांगितले.

शिक्षणमंत्री श्री. तावडे यांच्या उपस्थितीत आज विबग्योर स्कूल,पुणे;इंदिरा नॅशनल स्कूल, पुणे; युरो स्कूल, पुणे; सिंहगड स्प्रिंगडल स्कूल, पुणे; महर्षि कर्वे शिक्षण संस्था, पुणे; इमॅन्युअल मारथोमा इंग्लिश मिडीयम स्कूल, पुणे या सहा शाळांची सुनावणी पार पडली.

# पाणलोटांचा विकास केला तर कधीही दुष्काळ पडणार नाही : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



लातूर : राज्यातील पाण्याची समस्या सोडविण्यासाठी पाणलोटांचा विकास करणे गरजेचे आहे. राज्यातील पाणलोटांचा विकास केला तर राज्यात कधीही दुष्काळ पडणार नाही असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हलगरा येथे आज केले.

निलंगा तालुक्यातील हलगरा येथे आयोजित श्रमदान कार्यक्रमानंतर शिवार संवाद अंतर्गत शेतकऱ्यांशी साधलेल्या संवादाच्या वेळी ते बोलत होते.

यावेळी पालकमंत्री संभाजी पाटील- निलंगेकर, खासदार सुनील गायकवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी माणिक गुरसळ, पोलिस अधीक्षक डॉ. शिवाजीराव राठोड आदी उपस्थित होते.

हलगरा गावांतील गांवकऱ्यांनी लोकसहभागातून केलेल्या जलयुक्त शिवारांच्या कामांची स्तुती करतांना मुख्यमंत्री म्हणाले की, विविध योजना राबवून राळेगण सिध्दी ज्याप्रमाणे स्वयंपूर्ण बनले आहे त्याच प्रमाणे हलगरा गांव देखील स्वयंपूर्ण बनले पाहिजे.चित्रपटातला नायक काही मिनिटांत गांवाचे चित्र पालटतो पण ते काल्पनिक असते मात्र तुम्ही एकत्र येऊन जे जलयुक्त शिवाराचे काम केले आहे ते पाहता तुम्ही सर्व हिरो आहात आणि तेही खरे हिरो आहात. गांवकऱ्यांचे हे काम पाहून मी हलगरा हे गांव दत्तक घेत असून या गावात सर्व योजना पोहचविणार असल्याचेही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

पाण्याच्या महत्वाविषयी बोलतांना मुख्यमंत्री म्हणाले की, जिथे पाणी तिथे संस्कृती असते. पाणी संपले की संस्कृतीचा नाश होतो. छत्रपती शिवाजी महाराजांनी देखील पाण्याचे महत्व ओळखून प्रत्येक किल्ल्यात पाण्याचे योग्य पध्दतीने व्यवस्थापन केले होते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर देशाचे पाटबंधारे मंत्री असतांना त्यांनी अनेक मोठ्या धरणांची निर्मिती केली. परंतु ही धरणे बांधत असतांनाच त्यांनी जलसंधारणाच्या कामांना देखील प्राधान्य दिले होते यावरुन आपणाला पाण्याच्या एका थेंबाचे देखील महत्त्व कळायला पाहिजे. पाण्याचा एक एक थेंब माझ्या गावात अडवूण तो जमिनीत मुरवणारआणि गांव पाण्याच्या बाबतीत स्वावलंबी करणार असा गांवकऱ्यांनी संकल्प केला पाहिजे. जल स्वातंत्र्यांच्या लढाईत सर्वजण एकत्र आले पाहिजे. देशात जेवढी मोठी धरणे आहेत त्यापैकी ४० टक्के धरणे हे राज्यात आहेत मात्र तरीही राज्यातील ८० टक्के शेती ही कोरडवाहू आहे. राज्यातील दुष्काळ हा निसर्गनिर्मित नसून मानवनिर्मित आहे. त्यामुळे जलयुक्त शिवारांची मोठ्या प्रमाणात कामे होणे आवश्यक असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

जलयुक्त शिवार योजनेसंदर्भात बोलतांना मुख्यमंत्री म्हणाले की, यापूर्वी जलसंधारणाच्या अनेक योजना राबविल्या जात होत्या. आता १४ योजना एकत्र करुन जलयुक्त शिवार ही योजना राबविण्यात येत आहे. ही योजना यशस्वी होण्यामागचे महत्त्वाचे कारण म्हणजे लोकसहभाग. कोणतीही योजना लोकसहभागाशिवाय यशस्वी होत नाही. राज्यात वॉटर कपच्या माध्यमातून आणि नाम या संस्थेच्या माध्यमातून जलयुक्त शिवारांची अनेक कामे करण्यात आली आहेत. हलगरा गावातील दत्ता पाटील हे स्वत: अमेरिकेत असताना देखील त्यांचा गावाच्या विकासाचा ध्यास खरंच वाखाण्यांजोगा आहे. अनेक बाबतीत लातून पॅटर्न देणाऱ्या लातूरने जलयुक्त शिवाराच्या बाबतीत देखील नवीन हलगरा पॅटर्न अस्तित्वात आला असल्याचेही यावेळी मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

गांवकऱ्यांच्या श्रमदानाविषयी बोलतांना मुख्यमंत्री म्हणाले की, शिवजयंती आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंती दिनी गावकऱ्यांनी डीजेचा वापर न करता श्रमदानातून जलयुक्तचे केलेले काम खरंच कौतुकास्पद आहे. गांवकऱ्यांनी आता गट शेती या योजनेचा देखील लाभ घ्यावा आणि गावाचा विकास करावा. २० शेतकऱ्यांनी एकत्र येऊन किमान १०० एकर जमिनीच्या आधारे गट निर्माण करावा. गट शेतीच्या माध्यमातून त्या गावाला शासनाच्या सर्व योजनांचा लाभ देता येईल. कारण आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे एकट्या शेतकऱ्याला परवडणारे नाही त्यामुळे गट शेतीच्या माध्यमातून सर्वांना एकत्रितपणे अत्याधुनिक साधनांचा उपयोग करणे शक्य होईल आणि जेणेकरुन शेतीचे उत्पादन वाढेल. 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांनी सकस असा गाळ आपल्या शेतीत टाकावा जेणेकरुन पाण्याचे स्त्रोत मोकळे होतील आणि शेतीसाठी त्या गाळाचा फायदा होईल. शेतकऱ्यांना शेती परवडत नसल्याचे सर्वांत महत्वाचे कारण म्हणजे न परवडणारा हमी भाव होय. हमी भाव न परवडण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे उत्पादकता कमी असणे हे होय यासाठी उत्पादन खर्च कमी करुन उत्पादकता वाढवली पाहिजे असेही त्यांनी सांगितले.

पालकमंत्री संभाजी पाटील- निलंगेकर म्हणाले की, जलयुक्त शिवाराचे काम करण्याचा ध्यास घेतलेले गावकरी गेली ४५ दिवस श्रमदानाच्या माध्यमातून हे काम करत आहेत. आपण टंचाईची समस्या निर्माण झाल्यास प्रयत्न करतो पण पाऊस आल्यावर सर्व विसरून जातो. आता गावकऱ्यांनी यापुढे पाण्याचा प्रत्येक थेंब जमिनीत मुरविण्याला प्राधान्य देणे गरजेचे असल्याचेही संभाजी पाटील निलंगेकर यांनी सांगितले.

जलयुक्त शिवाराच्या यशस्वी गाथेविषयी योगेश या गावकऱ्याने आपले मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले की, २६ जानेवारी रोजी आम्ही जलयुक्त शिवाराचे काम सुरू केले. आत्तापर्यंत अडीच लाख टन गाळ उपसला आणि सुमारे पाच किलोमीटर लांबीचे नाल्याचे काम पूर्ण झाले. या कामासाठी पालकमंत्री संभाजी पाटील- निलंगेकर यांनी सुमारे १० लाख रुपयांचा निधी दिला. या नाल्याच्या माध्यमातून सुमारे २० हजार घनमीटर काम झाले आहे. या अंतर्गत तीन गॅबीयन बंधारे बांधले. शिवजयंती आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीदिनी गांवकऱ्यांनी श्रमदान करुन १० हजार घनमीटरचा बंधारा बांधला. विशेष म्हणजे वॉटर कप या स्पर्धेत भाग घेण्यासाठी केवळ २४ तास राहिले असतांना आम्ही या २४ तासात गावकऱ्यांच्या मदतीने एक बंधारा बांधला आणि या बंधाऱ्याच्या माध्यमातून पाच हजार घनमीटर पाणी थांबणार असल्याचेही गावकऱ्याने यावेळी सांगितले.

मुख्यमंत्र्यांचे श्रमदान आणि न्याहरी

हलगरा येथे आज मुख्यमंत्री येणार म्हणून श्रमदान करणारे ग्रामस्थ नव्हते ते तर गेली ४५ दिवस सतत श्रमदान करुन गावच्या शिवारातील पाणी अडविण्यासाठी तळमळीने काम करणारे गावकरी होते. याच गावकऱ्यात आज आणखी एक नाव जोडलं गेलं हे नाव एखाद्या साध्या माणसाचं नव्हतं तर चक्क महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं होतं . आज सकाळी-सकाळी निलंगा तालुक्यातील हलगरा येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे श्रमदान करुन उपस्थितांमध्ये सहजपणे सहभागी झाले.

मुख्यमंत्री फडणवीस हे हलगरा येथे येताच सर्वप्रथम श्रमदानाच्या ठिकाणाकडे वळले. मुख्यमंत्र्यांनी आल्या- आल्या हातात फावडे आणि टोपले घेऊन श्रमदानाला सुरूवात केली. केवळ हातात फावडे घेऊन फोटोपुरते श्रमदान न करता मुख्यमंत्र्यांनी तब्बल २० ते २५ मिनिटे श्रमदान केले. मुख्यमंत्री महोदयांनी फावड्याने १ ते २ फुट खोदले आणि निघालेली माती स्वत: उचलून बांधावर टाकली. एवढेच नव्हे तर मुख्यमंत्री नंतर श्रमदान करणाऱ्यात सहभागी झाले. त्यांच्यासोबतही श्रमदान केले. त्यांच्याशी संवाद साधला. शिवार संवाद कार्यक्रमानंतर मुख्यमंत्री महोदयांनी गांवकऱ्यांसोबत बाजेवर बसून गरम गरम न्याहरीचा आस्वाद घेतला. न्याहरीमध्ये प्रसिध्द असा 'निलंगा राईस' आणि 'सुशीला' हा पदार्थ त्यांनी चवीने खाल्ला. राज्याचा मुख्यमंत्री आमच्या शेतात येऊन न्याहरी करतो हे आमच्यासाठी अभिमानास्पद असल्याच्या भावना गांवकऱ्यांनी व्यक्त केल्या.

## राज्यातील रुग्णालये सुसज्ज करण्यासाठी राज्य कामगार विमा योजनेंतर्गत हस्तांतरीत करणार




मुंबई : रुग्णांची गैरसोय टाळण्यासाठी राज्यातील रुग्णालयांना अद्ययावत उपकरणे पुरविण्याबरोबरच त्यांना सर्व सोयी सुविधांयुक्त बनविण्यासाठी राज्य कामगार विमा योजनेअंतर्गत पात्र रुग्णालयांचे लवकरच हस्तांतरण केले जाईल असे आरोग्य मंत्री डॉ दीपक सावंत यांनी सांगितले.मंत्रालयात आरोग्य मंत्र्यांच्या दालनात राज्य कामगार विमा योजना महाराष्ट्र संदर्भात बैठक झाली त्यावेळी श्री सावंत बोलत होते.यावेळी खासदार चंद्रकांत खैरे,सार्वजनिक आरोग्य विभागाचे अप्पर मुख्य सचिव विजय सतबीर सिंह,आरोग्य सेवा आयुक्त डॉ प्रदीप व्यास यांची प्रमुख उपस्थिती होती.

महाराष्ट्रातील अनेक ठिकाणच्या शासकीय रुग्णालयांच्या नूतनीकरणाची व त्यांना आधुनिक अत्यावश्यक उपकरणांची गरज आहे,त्याबरोबरच अनेक रुग्णालयात मनुष्यबळाची कमतरता आहे,अशा रुग्णालयांचा या बैठकीत श्री सावंत यांनी आढावा घेतला. व अशा पात्र रुग्णालयांना महाराष्ट्र शासन राज्य कामगार विमा योजने अंतर्गत हस्तांतरित करून त्यांना सुसज्ज करण्यात येईल असेही श्री सावंत यांनी बैठकीत सांगीतले.

याप्रसंगी खासदार चंद्रकांत खैरे यांनी राज्य कामगार विमा योजनेंतर्गत औरंगाबाद जिल्ह्यातील चिखलठाण्यात उभारलेल्या रुग्णालयास मंजुरी देऊन राकावी योजनेंतर्गत चालविण्यास घ्यावे याचबरोबर वाळूज,रांजणगाव,पैठण,शेंद्रा या ठिकाणी प्रत्येकी एक राज्य कामगार विमा सेवा दवाखाना सुरु करण्यात यावा असा प्रस्ताव ठेवला. त्यावर श्री सावंत यांनी पात्र रुग्णालयांचे लवकर हस्तांतरण करावे असे निर्देश राज्य कामगार विमा महामंडळाच्या अधिकाऱ्यांना दिले.याबरोबरच राज्य कामगार विमा योजने अंतर्गत आवश्यक प्रमाणात मनुष्यबळ उभे केले जाईल त्यासाठीचा आराखडा तत्काळ सादर करावा असे निर्देशहि श्री सावंत यांनी अधिकाऱ्यांना दिले.

या बैठकीला,राकावी चे सचिव आर के कटारिया,डॉ अनिता सेठी,गणेश जाधव,के व्ही वाहूळ,एस के सिन्हा यांच्यासह राज्य कामगार विमा महामंडळ चे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## काजवा महोत्सव थांबविण्याची मागणी

नाशिक : जैवविविधतेमधील अत्यंत महत्त्वाच्या व दुर्मीळ होत चाललेल्या काजव्याचे संवर्धन व संरक्षण होणे गरजेचे असताना अकोले तालुक्यातील भंडारदरा परिसरात ऐन काजव्यांच्या प्रजननाच्या कालावधीत पर्यटकांकडून धिंगाणा घातला जात आहे. काजवा महोत्सव पर्यटन व वनविभागाने त्वरित बंद करून जैवविविधतेच्या संवर्धनासाठी पावले उचलावी, अशी मागणी आपलं पर्यावरण संस्थेने निवेदनाद्वारे केली आहे. मे महिन्याच्या अखेरच्या आठवड्यापासून तर पहिल्या पावसाच्या आगमनापर्यंत भंडारदरा-कळसुबाई-हरिश्चंद्र गड अभयारण्याच्या परिसरात असंख्य काजवे विविध झाडांवर चमकताना दिसतात. पर्यटनाच्या नावाखाली भर रात्री पर्यटकांकडून घातला जाणारा धिंगाणा या भागातील जैवविविधतेला हानी पोहचविणारा असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

## विद्यार्थ्यांच्या ज्ञान वाढीसाठी सहल अथवा ग्रामीण पर्यटनाला मान्यता



मुंबई : राज्यातील सर्व माध्यमांच्या तसेच सर्व मंडळाशी संलग्नित शाळांतील इयत्ता ५ ते १० मधील विद्यार्थ्यांना ऐतिहासिक,भौगोलिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक विषयाच्या ज्ञान वाढीसाठी शैक्षणिक सहल अथवा ग्राम पर्यटनाला मान्यता देण्यात आली आहे.

विदयार्थ्यांना शैक्षणिक सहल अथवा ग्राम पर्यटनाच्या वेळी ऐतिहासिक,भौगोलिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक माहिती मिळावी, तसेच त्या गोष्टी प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळावी यासाठी एका शैक्षणिक वर्षामध्ये एक शैक्षणिक सहल अथवा ग्रामीण पर्यटनाचे आयोजन करण्यास शाळांना मान्यता देण्यात आली आहे. मात्र अशा सहलीच्या आयोजनासाठी विदयार्थ्यांवर कोणत्याही प्रकारची सक्ती करण्यात येऊ नये. सहलीमध्ये सहभागी होण्याकरिता संबंधित पालक आणि विदयार्थ्यांची संमती असणे आवश्यक असणार आहे



महाराष्ट्र राज्य पोलिसमित्र

# मा.श्री. दादासाहेब गायकवाड

## यांचा छायाचित्र वृत्तांत...!


















# जीएसटीमुळे एक कर - एक राष्ट्र - एकसंघ बाजारपेठेची निर्मिती

मुंबई : वस्तू आणि सेवा कर प्रणालीमुळे एक राष्ट्र, एक कर आणि एकसंघ बाजारपेठ ही संकल्पना प्रत्यक्षात आकाराला येणार असून या करप्रणालीच्या अंमलबजावणी नंतरही महाराष्ट्र प्रगतीपथावरच राहील असा विश्वास अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम २०१७ विधेयक ३३ ला आज विधानसभेत एकमताने मंजूरी मिळाली. दरम्यान या विधेयकावरील चर्चेत उपस्थित करण्यात आलेल्या विविध मुद्यांवर आज अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सविस्तर उत्तरे दिली. ते म्हणाले की, २१ प्रकरणे, १७४ कलमे आणि ३ परिशिष्ट असलेला महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर कायदा सर्वंकष चर्चेतून तयार झाला आहे. यासाठी सर्व संबंधित घटकांच्या जवळपास ३९ बैठका घेण्यात आल्या. केंद्रीय अर्थमंत्री श्री. जेटली यांनी मुंबईत येऊन महाराष्ट्राच्या उद्योग-व्यापारी जगताचे या करप्रणाली संदर्भातील म्हणणे ऐकून घेतलं. राज्यातील उद्योग-व्यापाऱ्यांना त्रास देणे हे सरकारचे धोरण नाही. पण फसवणूक करून टॅक्स चोरी करणाऱ्यांसाठी या कायद्यात शास्तीची आणि शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. कर देणाऱ्या व्यापाऱ्यांकडे पाहण्याचा सरकारचा दृष्टीकोन सकारात्मक आहे. कारण ते भरत असलेल्या करातूनच राज्याच्या कल्याणकारी योजनांसाठी निधी मिळतो. त्यामुळे राज्यात प्रामाणिकपणे व्यापार करणाऱ्या उद्योग व्यापारी जगताला या करप्रणालीतून नक्कीच संरक्षण मिळेल, त्यादृष्टीने आपण त्यांना आश्वस्त क डिग्री इच्छितो असेही ते म्हणाले.

देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नात महाराष्ट्राचा हिस्सा १५ टक्के आहे. देशातील उत्पादनक्षेत्रातला महाराष्ट्राचा हिस्सा २०.५० टक्के इतका आहे. तर सेवा क्षेत्रातला हिसा १९.६० टक्के इतका आहे. महाराष्ट्र हे उत्पादनक्षम राज्य असले तरी महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न हे दोन तीन मोठे राज्यं वगळता इतर सर्व राज्यांच्या तुलनेत अधिक असून ते १ लाख ४७ हजार ३९९ रुपये इतके आहे. क्रयशक्ती अधिक असल्याने वस्तू आणि सेवा यांचा उपभोक्ता होण्याची क्षमता महाराष्ट्रात अधिक आहे त्यामुळे वस्तू आणि सेवा कर प्रणालीचा लाभ उपभोक्ता राज्याला अधिक आणि महाराष्ट्रासारख्या उत्पादनक्षेत्रातील राज्याला कमी होईल, ही शंका निराधार आहे.

वस्तू आणि सेवा कर परिषदेमध्ये कर दर निश्चित करतांना अतिशय शास्त्रशुद्ध आणि तर्काचा आधार ठेऊन ते निश्चित करण्यात आले आहेत. त्यात महाराष्ट्राची भूमिका खूप




मोठी आहे. महाराष्ट्राने संपूर्ण शक्तीने महाराष्ट्र हिताची, महाराष्ट्रातील उद्योग-व्यापारी आणि सर्वसामान्यांच्या हिताची बाजू वस्तू आणि सेवा कर परिषदेसमोर मांडली आहे. त्यामुळे महाराष्ट्राचा हक्काचा निधी महाराष्ट्राला नक्की मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर अधिनियम २०१७ मुळे केंद्र आणि राज्याचे एकूण १७ कर वस्तू आणि सेवा कर प्रणालीत विलीन होतील आणि आता एकच कर लागेल. या १७ कराच्या परिणामांना राज्यातील लोक त्रासले होते. राज्यातील कष्टकरी माणसाला १७ प्रकारचे रिटर्नस भरावे लागत. आता एकच कर लागू होणार असल्याने अनेक कराची दहशत संपुष्टात येईल आणि राज्यात उद्योग-व्यापारासाठी उत्तम वातावरण निर्माण होईल.

वस्तू आणि सेवा कर प्रणालीमुळे राज्य आणि देशाचा विकासदर अंदाजे २ टक्क्यांनी वाढेल असे सांगून अर्थमंत्री श्री. मुनगंटीवार पुढे म्हणाले की, वस्तू आणि सेवा कर प्रणालीमुळे देशात महागाई वाढेल ही भीती निराधार आहे. जीएसटीमुळे कॅनडामध्ये ६९.६ टक्के, युनायटेड किंगडममध्ये ३४.१ टक्के, इंडोनेशियामध्ये ४९.५ टक्के, न्युझिलंडमध्ये ५१.७ टक्के, चीनमध्ये ४७.९ टक्के तर सिंगापूरमध्ये ३३.३ टक्क्यांनी महागाई कमी झाली आहे. सीपीआय बास्केटमधील जवळपास ५३ टक्के वस्तूंना जीएसटीमध्ये करमाफी देण्यात आली आहे. ३२ टक्के वस्तूंवर निम्न म्हणजे ५ टक्के कर दर आहे. ०,५,१२,१८,२८ अशा पाच टप्प्यात या करप्रणालीत कर दरांची निश्चिती झाली आहे. सामान्य माणसाच्या गरजेच्या वस्तू करमुक्त ठेवण्याचा प्रयत्न यात करण्यात आला आहे.

इनपूट टॅक्स क्रेडिटमुळे मिळणारा लाभ ग्राहकांना देण्याची तरतूद असल्याने वस्तूंच्या किंमती कमी होतील. अन्नधान्य, अंडी, शेती उत्पादने, शेती बियाणे, पुस्तके अशा अनेक वस्तू करमुक्त ठेवण्यात आल्या आहेत तर शिक्षण, आरोग्य, लोकल प्रवास सेवा सारख्या अनेक महत्वाच्या सेवा ही करमुक्त ठेवण्यात आल्या आहेत. असे असले तरी आज ठरलेले कर दर हे अंतिम आहेत आणि ते कधीच बदलता येणार नाहीत असेही नाही, भविष्यात दर तीन महिन्यांनी वस्तू आणि सेवा कर परिषदेची बैठक होणार आहेत. त्यात दरांबाबतचा आढावा होईल. राज्याच्या अडचणीच्या बाबी तिथे पुन्हा मांडण्याची संधी मिळेल व त्यात आवश्यक ते बदल घडवून आणता येतील. कायद्यातील त्रुटी दूर करता येतील. या कायद्यामुळे एखाद्या समूहाला किंवा घटकाला अडचणी निर्माण होत असतील तर महाराष्ट्र हिताला सर्वोच्च प्राधान्य देऊन त्या गोष्टी वस्तू आणि सेवा कर परिषदेसमोर पूर्ण सामर्थ्यानिशी मांडल्या जातील.

कर उत्पन्न हे राज्याचे आर्थिक सामर्थ्य असलेला घटक आहे. आपत्कालीन परिस्थितीत, दुष्काळात राज्याला निधी कमी पडला किंवा अशा अतिमहत्वाच्या प्रसंगांना सामोरं जाण्याची दुर्देवाने वेळ आली तर वस्तू आणि सेवा कर प्रणालीच्या परिशिष्ट २७९ क प्रमाणे विशेष कर लावण्याचे अधिकार राज्याला मिळणार आहेत. त्यामुळे राज्य संकटात असतांना राज्य उत्पन्नाचे सगळेच दरवाजे बंद होतील, मग अशा प्रसंगांना सामोरं जातांना पैसे कुठून येतील ही शंका घेण्यास जागा नाही.

जीएसटीच्या संगणकीकरणाबाबतची जीएसटीएन ही कंपनी कायद्यांतर्गत नोंदणी झालेली सरकार संचलीत यंत्रणा असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. तसेच या कर प्रणालीमुळे राज्याला महसूल हानीपोटी मिळणारी भरपाई ही वित्त आयोगाकडून राज्यांना मिळणाऱ्या ४२ टक्क्यांच्या केंद्रीय निधी व्यतिरिक्त असेल असेही ते यावेळी म्हणाले.

जीएसटी करप्रणाली अंतर्गत २० लाखापर्यंतची उलाढाल करमुक्त ठेवण्यात आली आहे. हॉटेल व्यवसायामध्ये ५० लाखापेक्षा कमी उलाढाल असलेल्या व्यावसायिकांना या कर प्रणालीत ५ टक्के कर दर लागेल, वातानुकुलित यंत्रणा असलेल्या हॉटेल्सना १२ टक्के तर मद्य वितरित होणाऱ्या वातानुकुलित हॉटेल्सला १८ टक्के कर दर लागेल. या कर प्रणालीत जुन्या थकबाकीदारांचे करदायित्व संपुष्टात येणार नाही हे ही श्री. मुनगंटीवार यांनी यावेळी स्पष्ट केले.

## महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर अधिनियम, २०१७ ची वैशिष्ट्ये

* संपूर्ण देशात अप्रत्यक्ष कराचे एकसमान कर दर, एक समान पद्धती राहील.
* या कर प्रणालीच्या अंमलबजावणीसाठी संविधान कायदा २०१६ (एकशे एकावी सुधारणा) अमलात
* या कायद्यास राष्ट्रपतींची १२ एप्रिल २०१७ रोजी मंजूरी
* केंद्र सरकारकडून वसूल केल्या जाणाऱ्या कराची वजावट आतापर्यंत मिळत नव्हती. त्यामुळे संपूर्ण कर व्यवस्था कोलमडत होती.
* वेगवेगळ्या राज्यात वेगवेगळे मूल्यवर्धित कर कायदे, कर दर यामुळे देशाची विभिन्न आर्थिक क्षेत्रात विभागणी होत होती. तसेच जकात, प्रवेशकर, तपासणी नाके, यासारख्या अडथळ्यांना सामोरे जावे लागत होते. ते या करप्रणालीमुळे थांबेल
* या कर प्रणालीत केंद्र आणि राज्याचे १७ कर विलीन होणार असल्याने एकच करप्रणालीतून कर भरावा लागेल
* वस्तू आणि सेवा कर हा वस्तू निर्मिती किंवा आयातीपासून सुरु होणाऱ्या आणि किरकोळ विक्रीच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत प्रत्येक टप्प्यांवर वसूल होईल ( वस्तूंच्या किंवा सेवांच्या किंवा दोन्हीच्या पुरवठ्यावर)
* केंद्र सरकार केंद्रीय वस्तू सेवा कराच्या स्वरूपात कर बसवून त्याची वसुली करणार आहे तर राज्य शासन वस्तू किंवा सेवांच्या किंवा दोन्हीच्या राज्यांतर्गत होणाऱ्या पुरवठ्यावर राज्य वस्तू आणि सेवा कर बसवून करवसुली करणार आहे.
* वस्तू आणि सेवा करात केंद्राचे आणि राज्याचे एकूण १७ कर विलीन होतील. त्यात केंद्रीय उत्पादन शुल्क, अतिरिक्त उत्पादनशुल्क, उत्पादनशुल्क (औषधी आणि प्रसाधन सामग्री), अतिरिक्त उत्पादन शुल्क (कापड व उत्पादने) , अतिरिक्त सीमा शुल्क, विशेष अतिरिक्त सीमा शुल्क, सेवाकर, वस्तू आणि सेवांच्या पुरवठ्याशी संबंधित असलेला केंद्रीय अधिभार आणि उपकर हे केंद्रीय कर तर राज्याचा मूल्यवर्धित कर, केंद्रीय विक्रीकर, ऐषआराम कर, प्रवेश कर, (ऑक्ट्रॉय, एलबीटी, वाहनांवरील प्रवेशकर, वस्तूंवरील प्रवेश कर), करमणूक आणि मनोरंजन कर, जाहिरातीवरील कर, खरेदीकर, वन विकास कर (वनउपजाच्या विक्रीवरील कर) लॉटरी, बेटींग, जुगारावरील कर, वस्तू आणि सेवांच्या पुरवठ्याशी संबंधित असलेला कर आणि उपकर यांचा समावेश आहे.
* वस्तू आणि सेवा करामध्ये सीमा शुल्क, इतर सीमा शुल्क जसे अँटी डंपिंग शुल्क, सेफगार्ड शुल्क आणि निर्यात शुल्क हे केंद्रीय कर तर रस्ता व प्रवासी कर, टोल कर, मालमत्ता कर, वीज शुल्क, मुद्रांक व नोंदणी शुल्क, राज्य उत्पादन शुल्क हे राज्य कर समाविष्ट होणार नाहीत
* देशी वा विदेशी मद्य, कच्चे तेल, डिझेल, पेट्रोल, नॅचरल गॅस, विमानाचे इंधन या गोष्टी जीएसटी क्षेत्राबाहेरील वस्तू आहेत. मात्र ठराविक कालावधीनंतर पेट्रोलियम वस्तू जीएसटीअंतर्गत आणण्याचे प्रयोजन संविधान संशोधन अधिनियमात करण्यात आले आहे. याबाबतचा निर्णय जीएसटी कौन्सीलमध्ये होईल.
* जीएसटी हा कन्झमशन टॅक्स आहे. ज्या राज्यामध्ये वस्तू किंवा सेवांचा उपभोग होईल तिथे कर जमा होईल.
* जीएसटीअंतर्गत आयजीएसटी कराची आकारणी केंद्र शासनामार्फत आंतरराज्य पुरवठा करणाऱ्या व्यापाऱ्यांवर करण्यात येईल. आकारणी झालेल्या कराची पूर्ण वजावट वस्तू आणि सेवांची खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यास मिळेल.
* केंद्र व राज्य शासनाचे बहुतांश अप्रत्यक्ष कर एकत्र आल्याने करप्रणाली सुटसुटीत व सोपी होईल.
* सामान्यपणे उपभोग करण्यात येणाऱ्या वस्तू कर माफ आहेत. करावर कर लागत नसल्याने वस्तूंच्या किंमती स्वस्त होऊन त्याचा ग्राहकांना लाभ मिळेल.
* एकसमान करप्रणाली लागू झाल्याने एकसंघ बाजारपेठ निर्माण होईल.
* निर्यातदाराला त्याने निर्यातीसाठी वापरलेल्या सर्व खरेदीमालावर दिलेल्या कराचा परतावा मिळणार असल्याने आंतरराष्ट्रीय पातळीवर त्याला आपल्या मालाची किंमत स्पर्धात्मक ठेवणे शक्य होईल.

# दरवर्षी होणार १७५ कोटी रुपयांची बचत

मुंबई : शासकीय इमारतींमध्ये एलईडी उपकरणे बसविण्याच्या प्रकल्पात पुढाकार घेणारे महाराष्ट्र हे पहिलेच राज्य ठरले आहे. यामुळे राज्याची दरवर्षी सुमारे १७५ कोटी रुपयांची बचत होणार आहे. केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री पियुष गोयल आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत याबाबतच्या करारावर आज सह्या करण्यात आल्या.

श्री. गोयल यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत आयोजित ‘इमारतींमधील ऊर्जा कार्यक्षमता’ या विषयावरील राष्ट्रीय कार्यशाळा आज झाली. याप्रसंगी सार्वजनिक बांधकाम मंत्री चंद्रकांत पाटील, नीती आयोगाचे अतिरिक्त सचिव अनिलकुमार जैन, केंद्र शासनाच्या ऊर्जा विभागाचे सल्लागार राज पाल, राज्य शासनाच्या ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव अरविंद सिंग, सार्वजनिक बांधकाम विभागाचे (बांधकाम) सचिव अजित सगणे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे (रस्ते) सचिव सी. पी.जोशी, फिक्कीचे चेअरमन जसपाल सिंग बिंद्रा उपस्थित होते.


देशभरात ऊर्जा कार्यक्षम एलईडी उपकरणे बसविण्याच्या केंद्र सरकारच्या उपक्रमाची दखल जगभरातील अमेरिका, स्वीडन आदी पुढारलेल्या देशांनीही घेतली आहे, असे सांगून श्री. गोयल म्हणाले की, देशभरात सर्वसामान्यांच्या घरांमध्ये ७७ कोटी एलईडी बल्ब बसविण्याच्या केंद्र शासनाच्या प्रकल्पामुळे दरवर्षी ४० हजार कोटी रुपयांची वीजबचत होणार आहे. जगभरातील १९३ देशांनी एकमताने कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण कमी करण्यासाठी कार्यपत्रिका तयार केली होती. त्यामध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सर्व जगाचे नेतृत्व केले. अक्षय ऊर्जा कार्यक्रम राबविण्याचा भारताचा दृढ संकल्प आहे. इंग्लंड सरकार आणि भारत सरकार यांच्यात नुकत्याच झालेल्या करारानुसार ‘उजाला’ कार्यक्रमांतर्गत तेथील १० कोटी बल्ब बदलण्याच्या कार्यक्रमाचा शुभारंभ झाला.

ईईएसएल यापूर्वी दरवर्षी ६ लाख एलईडी बल्बची निर्मिती करत होती ती आता केंद्र शासनाच्या कार्यक्षमतेमुळे एका दिवशीच तेवढ्या बल्बची निर्मिती करत आहे, असे सांगून श्री. गोयल म्हणाले की, यापूर्वी ३१० रुपयांना विकला जाणारा हा बल्ब या क्षेत्रातील नामांकित कंपन्यांशी चर्चा केल्याने सर्वसामान्यांना केवळ ९९ रुपयांना उपलब्ध करुन दिला जात आहे. भारतातील ७७ कोटी बल्ब बदलण्याच्या कार्यक्रमामुळे सर्वसामान्य केंद्र शासनाच्या योजनेशी जोडले गेले. या प्रकल्पामुळे दरवर्षी देशाची ४० हजार कोटी रुपयांची बचत होणार असून ८० दशलक्ष टन कार्बन उत्सर्जन कमी होणार आहे. तसेच ११ हजार २०० कोटी युनिट्स वीज वाचणार आहे. ऊर्जा कार्यक्षमता हा विषय इमारतींशी लागू असल्याने यापुढे वास्तुशास्त्रज्ञ, बांधकाम व्यावसायिकांनाही ऊर्जा कार्यक्षम इमारतींच्या कार्यक्रमात सहभागी करुन घेण्याची गरज असल्याचे केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री म्हणाले.

भारतात सर्वाधिक २३ हजार मेगावॅट वीजेची मागणी महाराष्ट्रात असताना ही परिस्थिती राज्य शासनाने अत्यंत कार्यक्षमतेने हाताळली याचे कौतुक करुन श्री. गोयल म्हणाले की, वेस्टर्न कोलफील्डकडून होणारा नियमित आणि दर्जेदार कोळसा पुरवठा हे देखील यासाठी उपयुक्त ठरले असून वीजनिर्मितीची किंमत २० टक्क्यांनी कमी झाली आहे. वीजेची मागणी कार्यक्षमपणे हाताळल्यामुळे सर्वसामान्यांचे वीजबील कमी करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरले आहे, असेही ते म्हणाले.

# केवळ नशीब बलवत्तर म्हणूनच मुख्यमंत्री बचावले





लातूर : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे हेलिकॉप्टर निलंगा येथील शिवाजी विद्यालयाच्या मैदानावरून मुंबईच्या दिशेने गुरुवारी सकाळी ११.४८ वाजण्याच्या सुमारास टेकअप होत असताना अचानक कोसळले. या अपघातात मुख्यमंत्र्यांसह चौघे जण बालंबाल बचावले असून, पायलट संजय कर्वे किरकोळ जखमी झाले आहेत. ८० फुटांवरून हेलिकॉप्टर थेट जमिनीवर कोसळले असते वा ११ किलो वॅट व्होल्टची वीज वाहणा-या तारांवर कोसळले असते वा हेलिकॉप्टर थांबले. तेथून सात फुटांवर असलेल्या २२० केव्हीच्या डीपीतील ट्रान्सफॉर्मरवर आदळले असते तर काय झाले असते वा हेलिकॉप्टरमध्ये स्फोट झाला असता, याचा विचारच न केलेला बरा. त्यामुळे केवळ नशीब बलवत्तर म्हणूनच या अपघातातून मुख्यमंत्री वाचल्याचे बोलले जात आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बुधवारपासून लातूर जिल्हा दौ-यावर होते. निलंगा येथे पालकमंत्री संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या घरी मुक्कामी होते. गुरुवारी सकाळी ७ वाजता हलगरा येथे मुख्यमंत्र्यांनी पाणी फाऊंडेशनच्या उपक्रमाला भेट देऊन श्रमदानही केले. त्यानंतर औराद शहाजानी, हंगरगा, अनसरवाडा गावांना भेटी देऊन संवाद सभा घेतल्या. संवाद सभेचा कार्यक्रम आटोपून ते परत निलंग्याकडे रवाना झाले. शिवाजी विद्यालयाच्या मैदानावरील हेलिपॅडवरून मुंबईकडे रवाना होण्यासाठी ११.३० वाजता पोहोचले. ११.४८ वाजता ते हेलिकॉप्टरमध्ये जाऊन बसले. त्यांच्यासमवेत अपर मुख्य सचिव प्रवीणसिंह परदेशी, जनसंपर्क अधिकारी केतन पाठक, खासगी स्वीय सहाय्यक अभिमन्यू पवार आणि पायलट संजय कर्वे व अन्य एकजण होते. ११.४९ वाजता हेलिकॉप्टर टेकअप् झाले. यावेळी सारा परिसर धुळीने व्यापला. यातच ५०-६० फुटांवर हेलिकॉप्टरने उड्डाणही घेतले. मात्र हवेचा दाब कमी झाल्याने हेलिकॉप्टर अस्थिर झाले. त्यामुळे पायलट संजय कर्वे यांनी हेलिकॉप्टर लँडिंग करीत असताना विजेच्या तारांना हेलिकॉप्टरचा पंखा घासल्याने पुन्हा आणखीनच हेलिकॉप्टर अस्थिर झाले आणि काही कळण्याच्या आतच हेलिकॉप्टर म्हाडा झोपडपट्टीतील रस्त्यावर कोसळले. रस्त्यावर उभ्या असलेल्या एका ट्रकला आणि भरत कांबळे यांच्या घराला घासून हेलिकॉप्टर कोसळले. या अपघातात जनसंपर्क अधिकारी केतन पाठक यांच्या डोक्याला किरकोळ मार लागला असून, केवळ नशीब बलवत्तर असल्याने मुख्यमंत्री फडणवीस, प्रवीणसिंह परदेशी, अभिमन्यू पवार व दोन पायलट सुखरुप बचावले आहेत.

### वीज प्रवाह तत्काळ बंद झाल्याने मोठा अनर्थ टळला...

हेलिकॉप्टरचे पंखे वीज तारांना लागले. यामुळे स्पार्किंग होऊन तारा तुटल्या. सुदैवाने तारा तुटून वीज प्रवाहही खंडित झाला. त्यामुळे अनर्थ टळला. दरम्यान, काही क्षणातच हेलिकॉप्टर म्हाडा झोपडपट्टीतील एमएच २४ बीजे २३७४ या ट्रकवर आढळून जमिनीवर कोसळले. यावेळी एकच हाहा:कार उडाला. पोलीस प्रशासन, अग्निशमन दल या सर्वांनीच म्हाडा झोपडपट्टीत धाव घेतली.

### भय काळजात ठेवून मुख्यमंत्र्यांना निलंगावासीयांनी हेलिकॉप्टरमधून उतरविले...

पोलीस आणि मैदानावरील कार्यकर्ते म्हाडा झोपडपट्टीत पोहोचण्यापूर्वीच तेथे उपस्थित असलेले नागरिक इरफान शेख यांनी हेलिकॉप्टरचे दार काढून मुख्यमंत्र्यांना बाहेर काढून ॲम्ब्युलन्सद्वारे पालकमंत्री संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या निवासस्थानी रवाना केले. येथे तज्ज्ञ डॉक्टरांनी मुख्यमंत्र्यांची प्रकृतीची तपासणी केली.

### पवनहंस कंपनीचे हेलिकॉप्टरमध्येच होता दोष....

जेमतेम तीन वर्षांपूर्वीचे जुने असलेले हेलिकॉप्टर सिकॉरस्की कंपनीचे आहे. या हेलिकॉप्टरमध्ये सात प्रवासी क्षमता असून, दिवसाला ८०० कि.मी. प्रवास या हेलिकॉप्टरमधून करता येऊ शकतो. मागच्या छोट्या पंख्यात हवेचा कमी दाब निर्माण झाला. त्यातच टेकअप होताना या पंख्याला विजेच्या तारांचे घर्षण झाल्याने हेलिकॉप्टर अस्थिर झाल्याचे बोलले जात आहे.

### अपघातात मुख्यमंत्र्यांचा मोबाईल हरवला...

अपघातात मुख्यमंत्र्यांचा मोबाईल हरवला असून, हेलिकॉप्टरच्या अपघातस्थळी पालकमंत्र्यांच्या कार्यकर्त्यांनी मोबाईलचा शोध घेतला. मात्र मोबाईल सापडला नसल्याचे सांगण्यात आले.

---

# दादासाहेब गायकवाड; सन्मान पोलीस मित्राचा

पान ०१ वरून.. जिल्ह्याचे राजकीय वातावरण ढवळून काढले होते. तत्कालीन मुख्यमंत्री तथा दिवंगत नेते यशवंतराव चव्हाण यांच्या विचारसरणीचे जिल्ह्यावर प्राबल्य होते. त्यांच्यात कुशीत तयार झालेले नामदेवराव जगताप जिल्ह्यातील पाणी आणि इतर प्रश्नांवर मुंबई मंत्रालयात पोटतिडकिने भांडायचे. नामदेवराव जगताप हे करमाळा परिसरातील मुरब्बी राजकीय व्यक्तीमत्त्व. प्रत्येक कुटुंबाशी त्यांचा थेट संबंध. त्यामुळे वीस वर्षे ते या परिसरातून आमदार राहिले. यातच त्यांनी नजर दादासाहेब गायकवाड यांच्यावर पडली. तिशीमध्ये असलेले दादासाहेब यांची सामाजिक जाणिव व काम करण्याची पद्धत वेगळीच होती. त्यामुळे नामदेवराव जगताप यांच्या नजरेतून हे व्यक्तिमत्त्व सुटणारे नव्हते. नामदेवराव जगताप यांनी दादासाहेब यांची विश्वासू कार्यकर्ता म्हणून नियुक्ती केली. दादासाहेबांनी देखील त्यांच्या या नियुक्तीला खरे उतरले. नामदेवराव जगताप यांच्याबरोबर दादासाहेब यांचे मुंबई मंत्रालयात जाणे वाढले. त्यामुळे मंत्रालयातील काम म्हणजे थेट जनतेच्या कामाशी संबंध येऊ लागला. त्यामुळे दादासाहेब यांच्या सामाजिक जाणिवेला अधिकच धार चढली. याचवेळी त्यांचा मुंबई मंत्रालयाशेजारी असलेल्या पोलीस महानिरीक्षक कार्यालयाशी संबंध आला. मुंबई मंत्रालयात जेव्हा दादासाहेब येत असत त्यावेळी ते या पोलीस कार्यालयात येऊन बसत असत. त्यामुळे तिथे तक्रार घेऊन येणारी लोकांच्या कैफियती समजू लागल्या. त्या सोडविण्यासाठी ते मदत करू लागले. न्याय व खऱ्याची बाजू घेऊन ते थेट पोलीस अधिकाऱ्यांपर्यंत तक्रारदाराला घेऊन जायला घाबरत नसत. त्यातच ते आमदाराचे विश्वासू म्हटल्यावर त्याचाही त्यांना फायदा होत असत. पण, हे काम करताना त्यांनी फक्त लोकसेवेची जाणिव ठेवली. त्यात स्वार्थ कधी बघितला नाही.



मुंबई मंत्रालयात आल्यानंतर पोलीस कार्यालयाशी संबंध न येणे असे होत नसे. जेव्हा-जेव्हा दादासाहेब मुंबई येत तेव्हा ते हमखास पोलीस अधिकाऱ्यांना भेटत असत. एखाद्या अधिकाऱ्याची बदली झाली म्हणजे, त्या कार्यालयाशी संबंध संपले असे त्यांनी केले नाही. बदली झालेल्या अधिकाऱ्याच्या संपर्क ठेवून राहयचे. यातून त्यांचा पोलिसांशी एवढे संबंध वाढले, की त्यांना प्रत्येक अधिकारी ओळखू लागला. दादासाहेब फक्त ओळखीवर थांबले नाहीत, तर अधिकाऱ्यांच्या वाढदिवसांपासून ते त्यांच्या लग्नाच्या वाढदिवसापर्यंत शुभेच्छांमध्ये सहभागी होऊ लागले. त्यामुळे दादासाहेबांविषयी पोलीस अधिकाऱ्यांमध्ये चांगले वातावरण निर्माण झाले. दादासाहेब हे फक्त पोलीस अधिकाऱ्याशीच संबंध ठेवून होते असे नाही, तर ते पोलीस कर्मचाऱ्यांशी देखील मैत्रीचे नाते जपले. त्यांच्याही सुखा-दुःखात सहभागी व्हायचे. यामुळे पोलीस कर्मचाऱ्यांचे काम करताना येणारी अडचणी, परिवारीक अडचण समजून त्यावर देखील त्यांनी काम केले. परिणामी, कर्मचाऱ्यांना देखील दादासाहेब आपलेसे वाटू लागले. कर्मचाऱ्यांना येत असलेल्या न्यायिक अडचणीवर ते अधिकाऱ्यांशी चर्चा करून तोडगा काढू लागले. यामुळे पोलीस कर्मचाऱ्यांना कामात उत्साह टिकून ठेवण्यात दादासाहेबांनी अप्रत्यक्ष मोठी भूमिका बजावली. अशाच छोट्या-मोठ्या गोष्टींतून दादासाहेब पोलिसांचे मित्र बनले. आज या पोलीस मित्राच्या संबंधांना ४५ वर्षे पूर्ण होत आहेत. या काळात दादासाहेबांचा राज्यातील सुमारे ८० टक्के आय.एस. आणि आय.पी.एस. पोलीस अधिकाऱ्यांबरोबर आणि ९० टक्के पोलीस कर्मचाऱ्यांबराबेर संबंध प्रस्थापित झाले आहेत. या संबंधांची काळजी घेताना दादासाहेब यांनी कधीच अतिरेक केला नाही. कधीही स्वहित पाहिले नाही. नातेवाइकांसाठी कधीही अमिषाला बळी पडले नाहीत. फक्त मैत्री जपली. ती पण सौहार्यपूर्ण! दादासाहेब आज ६४ वर्षांचे आहेत. आजही त्यांना त्यांच्या संपर्कात आलेले पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे वाढदिवस, लग्नाचे वाढदिवस तोंडपाठ आहेत. दादासाहेब आजही न चुकता या अधिकाऱ्यांना सकाळी सहा वाजता वाढदिवसांच्या शुभेच्छासाठी संपर्क करतात. वेळप्रसंगी स्वतः जाऊन भेटतात. पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करतात. त्या मोबदल्यात फक्त एक कप चहा घेतात. त्यांच्या या उपक्रमामुळे अधिकाऱ्यांच्या पत्नींना देखील आपल्या पतीच्या वाढदिवसाची आठवण होते, हे विशेष! विक्रम बोके, रामराव वाघ, राजेंद्र सोनवणे, एस. एच. वीर, दत्ताजी फणसाळीकर, विवेक फणसाळकर, अतुल कुलकर्णी, चंद्रकांत दळवी, अनिल कवडे, विठ्ठलराव जाधव, सुनिल रामानंद, संभाजी कद्रू, सुभाष काकडे, विजय वाघमारे, सुनील केंद्रे, विपीन शर्मा, जगदीश पाटील, पद्नाभम अशा आय.एस. व आय.पी.एस. अधिकाऱ्यांशी आपले विशेष संबंध असल्याचे दादासाहेब आवर्जुन सांगतात. या ४५ वर्षांच्या पोलीस मित्र वाटचालीत दादासाहेब मागे वळून पाहताना पोलिसांच्या सुख-दुःखात सहभागी झाल्याचा आनंद आहे. त्याचप्रमाणे आयुष्यात कोणाचा तरी मित्र व्हावे, असे देखील ते सल्ला देतात.

# लातूर राज्यातील पहिला बेघर मुक्त जिल्हा करण्याचे मुख्यमंत्र्यांचे आवाहन

लातूर : जलयुक्त शिवार अभियानातून करण्यात येणारे पाण्याचे काम हे महत्त्वपूर्ण असे राष्ट्रीय काम आहे. आपणास हे काम करण्याची संधी मिळाली आहे, असे समजून हे काम करावे. पाणी जेथे असते तेथे समृद्धी असते असे म्हटले जाते. त्यासाठीच येत्या तीन वर्षात राज्यातील चाळीस हजार तलाव पुनरुज्जीवित करण्याचा प्रयत्न आहे. लातूर जिल्हा राज्यातील पहिला बेघरमुक्त जिल्हा करा, असे आवाहन करून, लातूर जिल्ह्यातील अधिकाऱ्यांनी सरकारच्या प्राधान्यक्रमावरील (फ्लॅगशीप) योजना उत्कृष्टरित्या राबविल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अधिकाऱ्यांचेही या बैठकीत अभिनंदन केले.

जिल्हा नियोजन समिती सभागृहात झालेल्या या बैठकीस कामगार, भूकंप पुनर्वसन, कौशल्य विकास व माजी सैनिक कल्याण मंत्री तथा लातूरचे पालकमंत्री संभाजी पाटील-निलंगेकर, लातूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मिलिंद लातुरे, महापौर सुरेश पवार, खासदार डॉ. सुनील गायकवाड, खासदार रवींद्र गायकवाड, आमदार सर्वश्री त्र्यंबक भिसे, बस्वराज पाटील, विनायकराव पाटील, सुधाकर भालेराव, मुख्यमंत्री कार्यालयातील अप्पर मुख्य सचिव प्रवीण परदेशी, नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक चिरंजीव प्रसाद, लातूरचे उपमहापौर देवीदास काळे, औरंगाबाद विभागीय आयुक्त डॉ. पुरुषोत्तम भापकर, जिल्हाधिकारी जी. श्रीकांत, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.माणिक गुरसळ, जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. शिवाजीराव राठोड, तसेच विविध विभागांचे प्रमुख, अंमलबजावणी यंत्रणांतील अधिकारी आदींची उपस्थिती होती. यावेळी ते म्हणाले की, लातूर जिल्ह्यातील अधिकाऱ्यांनी राज्य सरकारच्या फ्लॅगशीप योजनांमध्ये उत्कृष्ट काम केले आहे. ही अतिशय चांगली कामगिरी आहे. काही योजनांत मागे राहिलेल्या तालुक्यांनाही आता पुढ गेले पाहिजे. या तालुक्यांना सोबत घेण्यासाठी इतरांनी प्रयत्न करावेत. लातूर जिल्ह्याने स्वच्छ भारत अभियानात दुष्काळानंतरच्याच एका वर्षात विक्रमी कामगिरी करत सर्वाधिक शौचालयांचे बांधकाम पूर्ण केले आहे. जिल्हा प्रशासनाने एखादी बाब मनावर घेतली, तर काय घडू शकते हे दाखवून दिले आहे. सरकारच्या योजना या ग्रामीण भागातील चित्र बदलविण्यासाठी असतात. जलयुक्त शिवार अभियानाच्या प्रभावी कामांमुळे आता राज्यभरात चांगले चित्र निर्माण झाले आहे. पाण्याच्या उपलब्धतेमुळे खरीप,रब्बीचा पेरा वाढला आहे. शेतकऱ्यांनी तीन-तीन पिके घेतली. पिण्याचे पाण्याचे संकट टळले, लातूरसह अनेक ठिकाणी टँकरमुक्ती साध्य झाली. यापुढे जाऊन आता राज्यात गाळ मुक्त धरण आणि गाळयुक्त शिवार योजना राबविण्यात येत आहे. यामुळे शेतकऱ्यांला तलावातील गाळ मिळाल्यास, त्याची जमीन सुपीक होईल, आणि दुसरीकडे मोठ्या प्रमाणात सिंचन क्षमता निर्माण होईल. अशारितीने या तीन वर्षात राज्यातील चाळीस हजार तलाव पुनरुज्जीवीत करावयाचे आहेत, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

# शिक्षण क्षेत्रात महाराष्ट्र १८ वरुन तिसऱ्या क्रमांकावर

मुंबई : शालेय शिक्षण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अभियानामुळे राज्यातील शाळा डिजिटल करण्यात येत असून डिसेंबर २०१८ पर्यंत राज्यातील सर्व शाळा डिजिटल होतील आणि त्यातून विद्यार्थ्यांना या अभियानांतर्गत आनंददायी, गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.



माहिती व जनसंपर्क महासंचालनालयनिर्मित 'मी मुख्यमंत्री बोलतोय' या कार्यक्रमाद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील युवा पिढीशी संवाद साधला. या कार्यक्रमाच्या प्रसारित झालेल्या पहिल्या भागात मुख्यमंत्री बोलत होते.

मुख्यमंत्री म्हणाले की, यश आणि त्यातून विकास साधण्यासाठी शिक्षण आवश्यक आहे. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अभियानांतर्गत राज्यातील शाळा डिजिटल करण्यासह विद्यार्थ्यांचा लर्निंग आऊटकम १०० टक्के करण्यावर विशेष भर देण्यात येत आहे. गेल्या २ वर्षातील शैक्षणिक प्रगती पाहता महाराष्ट्राने शिक्षण क्षेत्रात १८ व्या क्रमांकावरुन तिसऱ्या क्रमांकावर झेप घेतली आहे. आज खाजगी शाळांमधून जवळपास १५ हजार विद्यार्थी जिल्हा परिषद शाळेत शिकत आहेत, याचा अर्थ या शाळांमधील शिक्षण आणि प्रयोगशील शिक्षकांचे हे यश आहे. विशेष म्हणजे शहरांपेक्षा ग्रामीण भागात शाळा डिजिटल होत असून आतापर्यंत ग्रामीण भागातील ४४ हजार शाळा डिजिटल झाल्या आहेत.

'विद्यार्थ्यांसाठी शिक्षण क्षेत्रातील सुधारणा' या विषयावर बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, आज वेगवेगळ्या खाजगी शाळांमध्ये भरमसाठ शैक्षणिक शुल्क आकारले जात असल्याच्या तक्रारी येत आहेत, या तक्रारी दूर करण्यासाठी शुल्क नियामक प्राधिकरण काम करीत असून त्यासाठी नव्याने डॉ. पळशीकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे. अल्पसंख्यांक आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी असलेल्या योजना आणि लाभ यावर विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, राजर्षी शाहू महाराज शैक्षणिक प्रतिपूर्ती योजना यामुळे समाजातील सर्वच विद्यार्थ्यांना राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळेल. याबरोबरच जुन्या योजनांचे मूल्यमापन करण्यात येणार आहे. अल्पसंख्यांक, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विविध महामंडळांमार्फत दिले जाणारे शैक्षणिक कर्ज, नामांकित शाळांमध्ये प्रवेश, विद्यार्थ्यांसाठी स्वयम सारख्या विविध योजना महत्वपूर्ण ठरतील असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला 'टेकसॅव्ही' शिक्षकांचे मुख्यमंत्र्यांनी केले कौतूक विद्यार्थ्यांना घडविण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या आणि माहिती-तंत्रज्ञानाचा वापर करणाऱ्या ५० हजार शिक्षकांनी स्वतःला 'टेकसॅव्ही' घोषित केले आहे. या शिक्षकांनी वेगवेगळे प्स तयार करुन विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण डिजिटल शिक्षण देण्याचा प्रयत्न केला आहे.

# वयोवृध्द खेळाडू आणि कुस्तीगीरांना देण्यात येणाऱ्या मानधनाची निश्चिती

मुंबई : राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर अतुलनिय कामगिरी केलेल्या वयोवृध्द खेळाडूंना मानधन ही योजना क्रीडा संचालनालयामार्फत राबविण्यात येते. या योजनेंतर्गत राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर अतुलनिय कामगिरी केलेल्या वयोवृध्द खेळाडू आणि किताबप्राप्त कुस्तीगीरांना देण्यात येणाऱ्या मानधन रक्कमेची निश्चिती करण्यात आली आहे.



राष्ट्रीय स्तरावर भाग घेतलेल्या खेडाळूंना २५०० रुपये इतक्या मानधनाची निश्चिती करण्यात आली आहे. तर आंतरराष्ट्रीय स्तरावरील ऑलिंपिक/जागतिक अजिंक्य कुस्ती स्पर्धेत खेळलेल्या खेळाडूंसाठी ६,००० रुपये इतक्या मानधनाची निश्चिती करण्यात आली आहे. तर आशियाई अजिंक्यपद/एशियन गेम्स/इतर आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी झालेल्या खेळाडूंसाठी ४,००० रुपये इतक्या मानधनाची निश्चिती करण्यात आली आहे. राष्ट्रकुल स्पर्धा आणि अर्जुन पुरस्कार प्राप्त खेळाडू यांच्यासाठी अनुक्रमे ४,००० आणि ६,००० रुपये इतक्या मानधनाची निश्चिती करण्यात आली आहे. हिंद केसरी, रुस्तमे हिंद, भारत केसरी, महान भारत केसरी, महान भारत केसरी, महाराष्ट्र केसरी किताब प्राप्त कुस्तीगीर असलेल्या खेळाडूंसाठी ६,००० रुपये इतक्या मानधनाची निश्चिती करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत वयोवृध्द खेळाडूंना मानधनासाठी उत्पन्नाची मर्यादा एक लाख रुपये आहे. तसेच वयोवृध्द खेळाडूंनी त्यांचे हयातीचे आणि उत्पन्नाचे दाखले सादर करणे आवश्यक आहे. याबरोबरच अर्जदार पुरुष किंवा महिला खेळाडूंचे वय अर्ज करण्याच्या तारखेस ५० वर्षांपेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. हिंद केसरी, रुस्तमे हिंद, भारत केसरी, महान भारत केसरी, महान भारत केसरी, महाराष्ट्र केसरी किताब प्राप्त कुस्तीगीरांना वयाची अट लागू होणार नाही. दुर्धर व्याधीने आजारी खेळाडू (अर्धांगवायू, क्षय, कर्करोग, कुष्ठरोग इत्यादी आणि शारीरीक व्यंग असल्यास) यांनी अपंगत्व अथवा दुर्धर व्याधीसंबंधीचे शासकीय रुग्णालयाचे प्रमाणपत्र दिल्यास या खेळाडूंसाठी वयाची अट शिथील करण्यात येईल. आंतरराष्ट्रीय स्तरावरील मानधनासाठी खेळाडू हा ऑलिंपिक, आशियाई किंवा कॉमनवेल्थ यापैकी किमान एका स्पर्धेत सहभागी झालेला असावा.

राज्यातील १२७ वयोवृध्द खेळाडूंना मानधन योजनेअंतर्गत सन २०१६-१७ मध्ये ५६ लाख ४६ हजार रुपयांचा निधी वितरीत करण्यात आला आहे. या योजनेबाबतची सविस्तर माहिती व विहीत नमुन्यातील अर्ज जिल्ह्याचे जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहेत. या योजनेचा लाभ घेण्यासाठी वयोवृध्द खेळाडूंनी जिल्हा क्रीडा अधिकारी यांना संपर्क साधावा, असे आवाहन क्रीडा व युवक सेवा संचालनालयाचे उपसंचालक सी.आर.कांबळे यांनी केले आहे.

# राज्याचे आपत्ती व्यवस्थापन धोरण सर्वसमावेशक

नवी दिल्ली : महाराष्ट्राचे आपत्ती व्यवस्थापन धोरण सर्वसमावेशक असल्याचे, प्रतिपादन राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज येथे केले. 'राष्ट्रीय आपत्ती निवारण समिती' (एनपीडीआरआर) च्या दुसऱ्या बैठकीचे आयोजन विज्ञान भवन येथे करण्यात आले होते. या बैठकीची अध्यक्षता केंद्रीय गृहमंत्री राजनाथ सिंह यांनी केली. यावेळी श्री पाटील बोलत होते. यावेळी केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान मंत्री डॉ. हर्षवर्धन, महिला व बाल कल्याण मंत्री मनेका गांधी, केंद्रीय गृह राज्य मंत्री किरेन रिजिजु, हंसराज अहिर, विविध राज्यांचे मदत व पुर्नवसन मंत्री, वरीष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.



श्री पाटील म्हणाले, महाराष्ट्र राज्याने मागील २५ वर्षात लहान- मोठ्या अशा नैसर्गिक तसेच मानवनिर्मित अनेक आपत्तींचा यशस्वी मुकाबला केला आहे. यासाठी राज्याने आपत्ती व्यवस्थापन धोरणात सर्वसामवेशकता आणली आहे. या धोरणामध्ये शालेय विद्यार्थ्यांपासून, प्रशासकिय अधिकारी कर्मचारी ते सामान्य नागरीकांचा समावेश आहे.

महाराष्ट्र हे देशातील प्रथम असे राज्य आहे जिथे स्वतंत्र आपत्ती व्यवस्थापन विभाग आहे. १९९५ मध्येच राज्यात जोखीम भेद्यता आकलन (एचआरवीए) करण्यात आले आहे. याशिवाय प्रत्येक जिल्ह्यात आपत्ती व्यवस्थापन निपुण अधिकारी नियुक्त केले आहेत. आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ नुसार सर्वच शासकिय विभागात आपत्ती निवारणासंदर्भात पाऊले उचलली जात आहेत. टाटा सामाजिक विज्ञान संस्थेच्यामाध्यमाने तालुका ते राज्यस्तरावरील सर्व अधिकाऱ्यांचे आपत्ती जोखीम निवारण कार्यक्रम तयार केला जात असल्याचे त्यांनी सांगितले.
इराज्यात आपत्ती प्रतिसाद दल'
केंद्र शासनाच्या 'राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दला'च्या धर्तीवर राज्यातही 'राज्य आपत्ती प्रतिसाद दला' ची स्थापना करण्यात आली आहे. नागपूर, पुणे, धुळे या आणि अन्य ठिकाणी या दलाची तुकडी तैनात केली आहे. हे दल आपत्ती काळात लगेचच प्राथमिक सोयी उपलब्ध करून देऊ शकतात. यासह शांती काळात या दलाचे काम आपत्ती प्रवण क्षेत्राचा शोध घेणे, तसेच बचावात्मक प्रशिक्षण देण्याचे अतिरीक्त कामही सोपविण्यात आलेले आहे.
९ वी आणि १० वी च्या अभ्यासक्रमात आपत्ती व्यवस्थापन विषय
जनतेत जागृती करण्याबरोबर त्यांना शिक्षित करने ही महत्वपुर्ण आहे. विद्यार्थी ही भुमिका अधिक सक्षमपणे पार पाडु शकतात, त्यासाठी ९ वी आणि १० वीच्या अभ्यासक्रमात आपत्ती व्यवस्थापन विषय शिकवले जात आहेत. यासह राज्यातील शाळेंमध्ये सुरक्षा कार्यक्रमही राबविण्यात येत आहेत. यातंर्गत प्रथम टप्पात राज्यातील १५ जिल्हयांमध्ये १५०० शाळेत हा कार्यक्रम राबविला, असल्याची माहिती श्री पाटील यांनी दिली.
राज्य शासन ४० ते ५० कोटी वृक्षारोपण करणार
औद्योगिकीकरण, वाढत्या शहरीकरणामुळे वन क्षेत्रात घट झाली आहे. यावर मात करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने मागील वर्षापासून 'वन महोत्सव' या अंतर्गत १ जुलै २०१६ ला राज्यभरात २ कोटी वृक्ष लागवड केली आहे. हा कार्यक्रम राज्यभर अत्यंत यशस्वी झाला. येत्या दोन तीन वर्षात राज्य शासन ४० से ५० कोटी वृक्षारोपण करण्याचे लक्ष्य निश्चित केले आहे. या लक्ष्य पुर्तीसाठी गावातच नर्सरी सुरु करण्यात येईल. त्यामुळे रोजगारही मिळणार तसेच स्थानीक ठिकाणी रोपटेही मिळतील.
दुष्काळ सदृश्य ठिकाणांसाठी 'जलयुक्त शिवार'
महाराष्ट्रातील काही जिल्हे हे दुष्काळ प्रवण भागात मोडतात अशा ठिकाणी 'जलयुक्त शिवार' च्या माध्यमातून जमीनीतील पाण्याचे स्तर वाढविण्यात आले आहे. पावसाचे पाणी रोखुन जमीनीत मुरण्याचे काम 'जलयुक्त शिवार'मुळे होत आहे. शेततळे, तलाव, झ-यामधील पाणी अधिककाळ टिकून राहण्यासाठी गड्डयांची लांबी-रुंदी वाढविली जात जाते. त्यामुळे दुष्काळ सदृश्य भागात पाण्याच्या टंचाईचा प्रश्न कमी प्रमाणात उदभवल्याचे अनुभव आले आहेत.

# राज्यातील २१०० खाजगी व्यावसायिक महाविद्यालयाच्या शैक्षणिक शुल्क निश्चितीचे काम पूर्ण

मुंबई : राज्यातील २१०० खाजगी व्यावसायिक महाविद्यालयाच्या शैक्षणिक शुल्क निश्चितीचे काम शुल्क नियामक प्राधिकरणामार्फत पूर्ण करण्यात आले आहे. शासनाने महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था प्रवेशाचे व शुल्काचे विनियमन करण्यासाठी दि. १९ मार्च २०१६ रोजीच्या अधिसूचनेनुसार शुल्क नियामक प्राधिकरण गठित केले होते.

शैक्षणिक वर्ष २०१७-१८चे शुल्क निर्धारणाचे कार्य पूर्ण झाले असून प्रवेश घेतेवेळी विद्यार्थ्यांना ज्या संस्थेमध्ये प्रवेश घ्यावयाचा आहे, त्या संस्थेची अभ्यासक्रमनिहाय अंतिम शुल्काची माहिती प्राधिकरणाच्या www.sssamiti.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. शुल्क नियामक प्राधिकरणाने शैक्षणिक वर्षासाठी निश्चित केलेल्या शैक्षणिक शुल्काव्यतिरिक्त इतर कोणतेही अतिरिक्त शुल्क त्यांना विद्यार्थ्यांकडून घेता येणार नाही.

महाराष्ट्र राज्यातील विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थांमधील (प्रवेशाचे व शुल्काचे विनियमन) अधिनियमातील तरतुदीनुसार प्रत्येक विनाअनुदानित संस्थांनी, शुल्क नियामक प्राधिकरणाने मान्यता दिलेले पाठ्यक्रमनिहाय शैक्षणिक शुल्क आपल्या सूचना फलकावर आणि आपल्या संकेतस्थळावर मराठी व इंग्रजीमध्ये प्रदर्शित करणे बंधनकारक आहे. तसेच कोणत्याही संस्थेने एखाद्या विद्यार्थ्याकडून एका शैक्षणिक वर्षात एका वर्षाच्या शुल्कापेक्षा अधिक शुल्क वसूल केल्यास त्या संस्थेविरुद्ध कार्यवाही केली जाईल.


विद्यार्थी व पालक यांची एखाद्या शैक्षणिक संस्थेच्या शैक्षणिक शुल्काबाबत तक्रार असल्यास त्यांना शुल्क नियामक प्राधिकरणाने तक्रार करण्याची संधी उपलब्ध करुन दिली आहे, त्यासाठी शुल्क नियामक प्राधिकरणाच्या www.sssamiti.org संकेतस्थळावर तक्रार अर्जाचे पोर्टल सुरु करण्यात आले आहे.

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांत रुग्णखाटांच्या प्रमाणात मनुष्यबळ निर्मिती

मुंबई : राज्यातील सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयांमध्ये उपलब्ध रुग्णखाटांच्या प्रमाणात अध्यापक वर्ग व विद्यार्थी संख्या वाढविण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासनाला दिले असून त्याबाबतचा कृती अहवाल तीन महिन्यांत सादर करण्यासही सांगण्यात आले आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयांत पुरविण्यात येणाऱ्या आरोग्य सेवेचा दर्जा वाढविणे, अध्यापक डॉक्टरांवरील कामाचा ताण कमी करणे, उपलब्ध सोयी – सुविधांचा पूर्ण क्षमतेने उपयोग करणे आणि पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांची संख्या वाढविणे या बाबी यामुळे शक्य होणार आहेत.

रुग्ण आणि डॉक्टरांच्या हिताबरोबरच डॉक्टरांच्या सेवा व कर्तव्यामध्ये समतोल साधण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी हे निर्देश दिले असून त्याची पूर्तता करण्यासाठी वैद्यकीय शिक्षण खात्याचे मंत्री म्हणून आपण पाठपुरावा करीत असल्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री श्री. गिरीश महाजन यांनी सांगितले आहे.



वैद्यकीय शिक्षण संचालनालयातर्फे राज्यातील विविध शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये अध्यापकांची पदे निर्माण करताना संबंधित महाविद्यालयातील फक्त विद्यार्थी संख्या विचारात घेतली जाते. ही विद्यार्थी संख्या ठरविताना संबंधित वैद्यकीय महाविद्यालयात आवश्यक रुग्णखाटांचे किमान प्रमाण भारतीय आयुर्विज्ञान परिषदेने ठरवून दिले आहे. तथापि, राज्यात बहुतांश शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये भारतीय आयुर्विज्ञान परिषदेने ठरवून दिलेल्या रुग्णखाटांपेक्षा कितीतरी जास्त खाटा उपलब्ध असून त्या सर्व रुग्णांना वैद्यकीय सेवा पुरविण्यात येते. अतिरिक्त रुग्णखाटांची सेवा करताना डॉक्टरांवर, वैद्यकीय विद्यार्थ्यांवरही ताण येतो. त्यामुळे रुग्णसेवेचा दर्जा टिकविण्याठी व डॉक्टरांवरील ताण कमी करण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी तसे निर्देश दिले आहेत.

भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या निकषानुसार, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांत १ हजार रुग्णखाटा असल्यास तेथे २०० विद्यार्थी संख्या असे प्रमाण आवश्यक आहे. प्रत्यक्षात २०० एमबीबीएस विद्यार्थी संख्या असलेल्या नागपूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात १ हजार ४०१ रुग्ण खाटा, पुण्याच्या बी. जे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांत १ हजार २९६ तर मुंबईतील ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात २ हजार ८९५ रुग्णखाटा आहेत. औरंगाबादच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात १५० विद्यार्थी संख्या असून ७५० रुग्णखाटांची आवश्यकता असताना प्रत्यक्षात १ हजार १७७ रुग्णखाटा आहेत. धुळे येथील श्री. भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात १०० विद्यार्थी संख्येमागे ५०० रुग्णखाटा आवश्यक असताना प्रत्यक्षात ५४५ रुग्णखाटा आहेत. म्हणजेच अतिरिक्त रुग्णखाटांकरीता समप्रमाणात अध्यापक, वैद्यकीय विद्यार्थी, मनुष्यबळ यांची आवश्यकता आहे. हा समतोल साधण्याकरीता मनुष्यबळ निर्मिती करण्याचे आणि त्याचा कृती अहवाल सादर करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

# जिल्हा बँकेतील कर्मचाऱ्यांना पगारवाढ



अहमदनगर : जिल्हा सहकारी बँकेतील कर्मचार्यांना पगारवाढीचा करार बँक व कर्मचारी प्रातिनिधीक संघटना यांच्यात गुरुवार दि.११ मे रोजी झाला. दि अहमदनगर डिस्ट्रिक्ट सेंन्ट्रल को-ऑपरेटिव्ह बँक्स एम्प्लॉईज युनियन व अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांच्यात बँकेतील १ हजार चारशे कर्मचार्यांना साधारणत: ७ कोटी रुपयांची वार्षिक पगारवाढ देण्याबाबतचा करार झाला.

करारावर युनियनच्या वतीने कार्याध्यक्ष धनंजय भंडारे, जनरल सेक्रेटरी मधुकर खेडकर, सह सचिव मधुकर पठारे, मुरलीधर कुलकर्णी व बँकेच्या संचालक मंडळावरील कर्मचारी प्रतिनिधी भरत इथापे, सुभाष घुले तर बँकेच्या संचालक मंडळाच्या वतीने अध्यक्ष सीताराम गायकर, उपाध्यक्ष रामदास वाघ, मुख्य कार्यकारी अधिकारी रावसाहेब वर्पे यांनी स्वाक्षर्या केल्या. यावेळी बँकेचे ज्येष्ठ संचालक आ.शिवाजीराव कर्डिले, आण्णासाहेब म्हस्के, सुरेश कर्पे, रावसाहेब शेळके, जगन्नाथ राळेभात, अंबादास पिसाळ आदि संचालक उपस्थित होते.

जनरल मॅनेजर साधरणत: ९ हजार रु. ते शिपाई श्रेणी यांना ३ हजार पाचशे रुपयाची श्रेणीनिहाय वेतनवाढ करारान्वये मंजुर करण्यात आली आहे. सदर करार हा पाच वर्षासाठी असून तो एप्रिल २०१६ पासून पूर्वलक्षीप्रमाणे करण्यात आलेला आहे. तसेच पगारवाढ व्यतीरिक्त कर्मचार्यांना विविध भत्त्यांमध्ये वाढ करण्यात आली आहे. पुर्वलक्षी पध्दतीने करार संपन्न झाल्याने कर्मचार्यांमध्ये आनंद व समाधानाचे वातावरण आहे.

# प्राथमिक शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यासाठी लढत राहणार

अहमदनगर : राज्यातील प्राथमिक शिक्षकांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी कायम शासन दरबारी लढत राहणार आहे असे राज्याचे शिक्षक नेते संभाजीराव थोरात यांनी आज प्राथमिक शिक्षकांच्या मोर्चाला संबोधित करताना सांगितले .राज्यातील प्राथमिक शिक्षकांच्या २७ फेब्रुवारी २०१७ च्या अन्यायकारक बदली धोरणाविरोधात व इतर विविध प्रश्न सोडवण्यासाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने पुणे येथे राज्याचे शिक्षण आयुक्त यांचे कार्यालयावर राज्यस्तरीय मोर्चा काढण्यात आला होता त्यावेळी ते बोलत होते .दुपारी दोन वाजता भारतरत्न डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून या मोर्चाची सुरुवात झाली .शांततेच्या मार्गाने हा मोर्चा राज्याचे शिक्षण आयुक्त यांच्या कार्यालासमोरील पटांगणात जाऊन तेथे सभा झाली .या सभेचे प्रास्ताविक नाशिक विभाग अध्यक्ष आबासाहेब जगताप यांनी केले .बाळासाहेब मारणे व सरचिटणीस अप्पासाहेब कुल यांनी राज्यातून आलेल्या प्राथमिक शिक्षकांचे स्वागत केले .राज्यसंघाचे अध्यक्ष बाळकृष्ण तांबारे यांनी शासनाचे दिनांक २७ फेब्रुवारी २०१७ चे प्राथमिक शिक्षकांचे सध्याचे बदली धोरण कसे अन्यायकारक आहे हे सांगत इतर अनेक प्रश्न मांडले .राज्यसंपर्कप्रमुख व औरंगाबाद जिल्हा परिषदेचे सदस्य मधुकर वालतुरे यांनी विधानसभेचे सभापती हरिभाऊ बागडे यांचे मध्यस्थीने प्राथमिक शिक्षकांचे प्रश्न सोडवणार असल्याचे सांगितले .अहमदनगर जिल्हा प्राथमिक शिक्षक बँकेचे अध्यक्ष रावसाहेब रोहोकले यांनी २६ एप्रिल चा मोर्चा का माघारी घेतला हे सांगून मुंबईच्या मिटिंग मध्ये झालेल्या चर्चेनुसार कार्यवाही झाली नाही म्हणून हा मोर्चा काढावा लागला हे सांगितले .राज्यसंघाचे नेते संभाजीराव थोरात यांनी राज्यातील प्राथमिक शिक्षकांचे विविध प्रश्न जोरदारपणे मांडले .तसेच आतापर्यंत राज्यसंघाने शासन दरबारी पाठपुरावा करून सोडवलेल्या विविध प्रश्नांची माहिती दिली .तसेच प्राथमिक शिक्षक हा माझा परमेश्वर असून तो आनंदी राहण्यासाठी त्यांच्यावर अन्याय होता कामा नये ,शिक्षकांचे कोणतेही प्रश्न शासनाने प्रलंबित ठेवू नये यासाठी आयुष्यभर लढा देत आहे .प्राथमिक शिक्षकांचे सध्याचे अन्यायकारक बदली धोरण शासनाने मागे न घेतल्यास यापुढेही त्याबाबत जोरदार पाठपुरावा चालूच राहील तसेच दोन दिवसात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची संघाचे शिष्टमंडळ भेट घेऊन या अन्यायकारक बदली धोरनाबाबत पाठपुरावा केला जाईल असे त्यांनी सांगितले .त्यानंतर राज्याचे शिक्षण आयुक्त यांना राज्यातील प्राथमिक शिक्षकांच्या विविध प्रश्नांचे निवेदन देण्यात आले ,या निवेदनात २७ फेब्रूवारी २०१७ चे बदली धोरण रद्द करणे किंवा त्यात आवश्यक त्या सुधारणा करून तालुक्याच्या बाहेर प्रशासकीय बदली करू नये .१ नोव्हेंबर २००५ नंतर सेवेत आलेल्या शिक्षकांना जुनी पेंशन योजना लागू करणे ,शिक्षकांना संगणक प्रशिक्षणासाठी मुदतवाढ देऊन त्याबाबतची वसुली थांबवणे ,आंतरजिल्हा बदलीची प्रकरणे त्वरित निकाली काढणे ,सर्व विषय शिक्षकांना प्राथमिक पदवीधर वेतन श्रेणी देणे .हे निवेदन मुख्यमंत्र्यांचे नावे शिक्षण आयुक्त यांचेमार्फत दिले आहे .या मोर्चातील सभेचे सूत्रसंचालन राज्यसंघाचे कार्याध्यक्ष आंबादास वाजे यांनी केले .या मोर्चा साठी अहमदनगर जिल्ह्यातील शिक्षक संघाचे पदाधिकारी रावसाहेब रोहोकले ,आबासाहेब जगताप ,संजय शेळके ,बापूसाहेब तांबे, निळकंठ घायतडक ,विठ्ठल फुंदे ,दिलीप औताडे ,विजय माने,आर.पी .रहाणे, दत्ता कुलट ,तुकाराम अडसूळ ,शरद सुद्रीक ,संजय शिंदे ,,बाळासाहेब तापकीर ,अविनाश निंभोरे ,अर्जुन शिरसाठ,बाबा पवार ,आर .टी. साबळे ,,नानासाहेब बडाख ,प्रवीण ढुबे ,भाऊराव राहिंज किसन खेमनर, राम निकम ,संतोष राऊत , बाळासाहेब कापसे ,संतोष खंडागळे ,यांचेसह विविध पदाधिकारी ,तसेच सर्वसामान्य शिक्षक आणि राज्यातील शिक्षक संघाचे पदाधिकारी व प्राथमिक शिक्षक शिक्षिका मोठ्या संख्येने उपस्थित होते .

# राज्यात नवीन ३१६५ तलाठी साझ्यांसह ५२८ महसूल मंडळांच्या निर्मितीचा निर्णय

महाराष्ट्र शासन

मुंबई : राज्यातील वाढते नागरीकरण आणि लोकसंख्या विचारात घेऊन महसूल यंत्रणेशी संबंधित विविध कामे तातडीने पूर्ण व्हावीत आणि नागरिकांना प्रभावी सेवा मिळावी यासाठी राज्यात नवीन ३१६५ तलाठी साझे व ५२८ महसूल मंडळांच्या निर्मितीला आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या निर्णयानुसार पुढील चार वर्षात नवीन तलाठी आणि मंडळ अधिकाऱ्यांच्या नेमणुका टप्पाटप्प्याने करण्यात येणार आहेत. या निर्णयामुळे कर वसुलीशिवाय भूमि अभिलेखविषयक बाबी, दुष्काळ-नैसर्गिक आपत्तीतील मदत कार्य, जनगणना, निवडणुका, विशेष सहाय्य योजना, विविध दाखल्यांचे वाटप आदी कामे गतीने होण्यास मदत होणार आहे.

राज्यात सध्या अस्तित्वात असणाऱ्या रचनेनुसार प्रत्येकी सहा तलाठी साझ्यांचे मिळून एक महसूल मंडळ असते. राज्यात एकूण १२ हजार ३२७ तलाठी साझे व २ हजार ९३ महसुली मंडळे कार्यरत आहेत. परंतु वाढते नागरीकरण आणि लोकसंख्या यांचा विचार करता ही व्यवस्था अपुरी पडत असल्याचे लक्षात घेऊन तलाठी साझांच्या पुनर्रचनेसाठी नागपूर विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. या समितीने केलेल्या शिफारशींना मान्यता देतानाच त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी महसूलमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती नियुक्त करण्यात आली होती. या उपसमितीच्या शिफारशींनुसार आज निर्णय घेण्यात आला. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समितीकडून नवीन पदे एकाच वेळी मंजूर करून घेऊन ही पदे पुढील चार वर्षात टप्प्याटप्प्याने भरण्यात येणार आहेत.

यानुसार पहिल्या टप्प्यात महानगरपालिका, अ व ब नगरपरिषदा तसेच त्याचे परिघीय क्षेत्र आणि क वर्ग नगरपरिषदा यांचा विचार करुन या नागरी भागातील ४१५ व आदिवासी क्षेत्रातील ३५१ अशा एकूण ७६६ नवीन तलाठी साझे व १२८ महसूल मंडळांची निर्मिती २०१७-१८ या वर्षामध्ये करण्यात येणार आहे. तसेच दुसऱ्या टप्प्यात २०१८-१९ मध्ये अ व ब वर्ग गावांसाठी ८०० साझे व १३३ महसूल मंडळे निर्माण करण्यात येतील, तर २०१९-२० व २०२०-२१ या वर्षात अनुक्रमे ८०० व ७९३ तलाठी साझे आणि १३३ व १३४ महसूल मंडळांची निर्मिती करण्यात येणार आहे.

आजच्या निर्णयानुसार निर्माण करण्यात येणाऱ्या तलाठी साझे आणि महसूल मंडळांची विभागनिहाय माहिती पुढीलप्रमाणे- कोकण- (७४४ तलाठी साझे) (१२४ महसूल मंडळे), नाशिक- (६८९) (११५), पुणे- (४६३) (७७), औरंगाबाद- (६८५) (११४), नागपूर- (४७८)(८०), अमरावती- (१०६) (१८).

संपादक, मालक, प्रकाशक : श्री. प्रकाश भीमराज कराळे, मुद्रक : संजीवनी मुकुंद दळवी, प्रकाशक : प्रेरणा सार्वजनिक वाचनालय, संदीप नगर, प्लॉट नं. ४, मार्केटयार्ड जवळ, जिल्हा अहमदनगर ४१४ ००१, महाराष्ट्र, मुद्रण स्थळ : मनोज प्रिंट अँड प्रोसेसर्स, केडगाव देवी रोड, जिल्हा अहमदनगर ४१४ ००५


















# रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागीय अध्यक्षपदी दादाभाऊ कळमकर



अहमदनगर : बहुजनांच्या मुलांना सुशिक्षित करण्याचे काम रयत शिक्षण संस्थेने केले. यामुळे बहुजन समाजाची शैक्षणिक, वैचारिक व आर्थिक प्रगती झाली. रयत संस्था आत्मा समजून दादाभाऊंचे कार्य चालू असून, पवार साहेबांनी त्यांना पुन्हा संस्थेमध्ये काम करण्याची संधी दिली. हे त्यांच्या एकनिष्ठ व कामाची पावती आहे. त्यांच्या अनुभवाचा व दुरदृष्टीचा फायदा संस्थेला निश्चित होणार असल्याची भावना आ.अरुण जगताप यांनी व्यक्त केली.

शहर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागीय अध्यक्षपदी दादाभाऊ कळमकर तर सचिवपदी राधाबाई काळे महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.भाऊसाहेब कराळे यांची नियुक्ती झाल्याबद्दल आयोजित सत्कार कार्यक्रमात आ.जगताप बोलत होते. यावेळी आ.संग्राम जगताप, लक्ष्मण वाडेकर, शहर जिल्हाध्यक्ष प्रा.माणिक विधाते, अशोक बाबर, मा.महापौर अभिषेक कळमकर, नगरसेवक विपूल शेटीया, संभाजी पवार, सलीम शेख, अतुल भंडारी, सुरेश बनसोडे, अभिजीत खोसे, रेशमा आठरे, ॲड.शारदा लगड, साधना बोरुडे, रेखा जरे, राजश्री मांढरे, संजय झिंजे, दिपक सुळ, गजानन भांडवलकर, वैभव ढाकणे, आर्किटेक अर्शद शेख, अशोक कटारीया, शरद मडूर, अजय चितळे, बाबासाहेब गाडळकर, विकी जगताप, सारंग पंधाडे, पै.पवन भिंगारे, प्रशांत निमसे, हनिफ जरीवाला, भाऊसाहेब फुलसौंदर, सौ. दुमाटे, वैशाली ससे, अर्चना देवळालीकर, दिलदारसिंग बीर, अमित खामकर, संजय खताडे, अजय दिघे, बाली बांगरे, बाबूशेठ धाडीवाल, अंकुश मोहिते, महादेव कराळे, गिरीष रासकर, दत्तात्रय राऊत, कांताशेठ अष्टेकर, चेतन चव्हाण, तौसिफ खान, अमोल खांडेकर आदिसह राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते उपस्थित होते.

दादाभाऊ कळमकर म्हणाले की, निष्ठेने केलेल्या कामाची पावती या पदाद्वारे मिळाली आहे. रयत शिक्षण संस्थेची गुणवत्ता वाढली असून, बहुजनांच्या मुलांचा शैक्षणिक स्तर अधिक उंचावण्यासाठी कार्य केले जाणार आहे. पाय नेहमी जमीनीवर ठेवून राजकारणापेक्षा समाजकारणाला महत्त्व देवून काम केले. २५ वर्षे आमदारकी ज्यांच्याकडे होती, त्यांनी शहराच्या विकासात्मक दृष्टीकोनाने काडीमात्र काम केले नाही. एकाच खड्डेमय रस्त्याचे अनेकदा दुरुस्तीचे निवीदा काढण्याचा धंदा त्यांनी केल्याने शहराचा विकास खुंटला होता. कार्यकर्त्यांनी संयम ठेवून निष्ठेने काम करावे असाही सल्ला कळमकर यांनी यावेळी दिला.

